**मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले**

**अग्रणी महाविद्यालय कार्यक्रम (२०१८-१९)**

**एकदिवसीय कार्यशाळेचा अहवाल**

| **शीर्षक** | **संशोधन पध्दती** या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा | |
|---|---|---|
| **समिती** | **अध्यक्षा** | **तज्ज्ञ मार्गदर्शक** |
| अग्रणी महाविद्यालय | मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे | मा. डॉ. एकनाथ पाटील आणि मा. डॉ. अशोक जाधव |

**वार व दिनांकः** शुक्रवार, दि. २८ डिसेंबर २०१८, **वेळः** सकाळी ९ ते दुपारी ४

**स्थळः** सेमिनार हॉल

**सहभागः** पाच महाविद्यालयांचे प्रतिनिधी, तज्ज्ञ मार्गदर्शकः ०२, प्राध्यापकः १०, विद्यार्थीः ३१, समिती सदस्यः ०५, शिक्षकेतर कर्मचारी, शिपाई आणि विद्यार्थी स्वयंसेवकः ०८; एकूणः **५६**

**उद्देशः** १. संशोधनाचा अर्थ, स्वरुप आणि व्याप्ती समजाऊन घेणे; २. विविध विषयातील संशोधनपध्दतीचे आकलन करुन घेणे; ३. प्रस्ताव लेखनाचे टप्पे समजाऊन घेण; ४. संशोधनप्रकल्प लेखनातील विविध टप्प्यांचे आकलन करुन घेणे

**संक्षिप्त अहवाल**

पदवीतील विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी यासाठी, शिवाजी विद्यापीठाने **Research Promotion Scheme** सुरु केली. याअंतर्गत, अग्रणी महाविद्यालयांकडून विविध संशोधन प्रस्ताव मागवण्यात आलेले होते. त्यान्वये, डांगे महाविद्यालय–क्लस्टर अंतर्गत, एकूण, सहा महाविद्यालयांनी आपापले प्रस्ताव सादर केलेले होते. या प्रस्तावाशी संबधीत विद्यार्थी आणि त्यांचे मार्गदर्शक यांच्यासाठी संशोधन पध्दतीवर एक कार्यशाळा घेणे अपेक्षित होते. त्यानुसार, सदर कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती.

सर्वप्रथम, संत ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन, तसेच दीपप्रज्वलन करुन मान्यवरांनी कार्यक्रमाचे **उद्घाटन** केले. त्यानंतर, कार्यक्रम समन्वयक डॉ. निरंजन कुलकर्णी यांनी **कार्यशाळेची संकल्पना आणि उद्देश स्पष्ट** केले. तसेच, तज्ज्ञ **मार्गदर्शकांची ओळख** उपस्थितांना करुन दिली. पुढे प्राचार्यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन, त्यांचा **सत्कार** करण्यात आला.

कार्यशाळेच्या **पहिल्या सत्रामध्ये** तज्ज्ञ मार्गदर्शक मा. डॉ. एकनाथ पाटील यांनी प्रारंभ केला. **मौखिक परंपरातून दिसणारे स्त्रीजीवन** हा त्यांचा विषय होता. यासाठी त्यांनी प्रथम मौखिक परंपरा म्हणजे काय? हे स्पष्ट केले. पुढे, लोकसाहित्याचे स्वरुप, व्याप्ती, विविध प्रकार हे समजाऊन सांगीतले. त्यांनतर, त्यांनी काही चित्रफिती दाखवल्या. जात्यावरील ओवी, उखाणे, गोंधळ अशा त्या फिती होत्या. पुढे, **दुसऱ्या सत्रामध्ये,** मा. डॉ. अशोक जाधव यांनी मार्गदर्शन केले. **अर्थशास्त्र आणि वाणिज्य शाखेतील संशोधन पध्दती आणि प्रकल्प लेखन** हा त्यांचा विषय होता. यामध्ये, त्यांनी संशोधन पध्दतीचे सर्व टप्पे व्यवस्थित उलगडवून दाखवले. विषयाची निवड, त्याची स्वरुप व व्याप्ती निश्चित करणे, पूर्वसूरींच्या संशोधकांचा आढावा घेणे, आपले उद्देश आणि पध्दती निश्चित करणे, संदर्भ देणे इ. पध्दती त्यांनी खुलासेवार आणि योग्य ठिकाणी उदाहरणे देऊन स्पष्ट केल्या. **तिसरे सत्र** हे एक विशेष सत्र होते. या सत्रामध्ये, व्यंकटेश महाविद्यालयातील **विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पाचे सादरीकरण** केले. त्यांनी, आपला प्रस्ताव समजाऊन सांगीतला. तसेच, संशोधनाची प्रगती ही स्पष्ट केली.

अशा प्रकारे, या तिन्ही सत्रातील मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिकांनंतर, तज्ज्ञांनी **विद्यार्थ्यांशी चर्चा** केली. यावेळी विद्यार्थीनींनी विविध प्रश्न विचारले. त्यांचे यथायोग्य समाधान तज्ज्ञांनी केले. त्यानंतर, काही विद्यार्थी व प्राध्यापकांनी एकंदर कार्यशाळेबाबत आपले **मनोगत व्यक्त** केले.

शेवटी **अध्यक्षीय समारोपामध्ये** मा. डॉ. जुगळे यांनी संशोधनाचे महत्व विविध अनुभवांद्वारे समजाऊन सांगीतले. शेवटी डॉ. निरंजन कुलकर्णी यांनी **आभार** मानून कार्यक्रमाची सांगता केली.

त्यानंतर, **भोजनाचा** कार्यक्रम होऊन, **प्रमाणपत्राचे वाटप** झाले. यानंतर कार्यशाळेचा समारोप झाला.

या कार्यशाळेची तांत्रिक बाजू प्रा. निलेश कांबळे यांनी सांभाळली. तर प्रशासकीय बाजू श्री. संदिप इथापे यांनी सांभाळली. एकंदर व्यवस्थापकीय सहकार्य श्री. सचिन कांबळे, श्री. तानाजी धनगर, श्री. सुकुमार पुजारी या शिपाई वर्गाने आणि श्री. दत्तात्रय कोळी, श्री. महेश चौगुले इ. या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी दिले. भोजनव्यवस्थेचे सहकार्य श्री. आवळे (कोरोची) यांनी केले.

**उद्देशांची परीपूर्तीः** १. संशोधन म्हणजे काय आणि त्याचे महत्व लक्षात आले; २. विविध शाखांतील संशोधन पध्दती कशा असतात ते लक्षात आले ३. विषय निवडीपासून, संदर्भयादी पर्यंत, संशोधनाचे सर्व टप्पे समजून आले.

## कार्यशाळेची क्षणचित्रे







१. उद्घाटन समारंभ

२. प्रास्ताविक: डॉ. निरंजन कुलकर्णी (समन्वयक)

३. पाहुण्यांचे स्वागत








४. तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. एकनाथ पाटील

५. तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. अशोक जाधव

६. विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादरीकरण









७ ते ९. कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थ्यांचे मनोगत






१० व ११. उपस्थित विद्यार्थी आणि एकंदर कार्यशाळा

।। दुरितांचे तिमिर जावो।।

**मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले**

**शिवाजी विद्यापीठांतर्गत अग्रणी महाविद्यालय कार्यक्रम (२०१७-१८)**

**एकदिवसीय कार्यशाळा**

# विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृतीची जोपासना

**अध्यक्षा: मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे**

**तज्ज्ञ मार्गदर्शक: मा. डॉ. एकनाथ पाटील व मा. डॉ. अशोक जाधव**

**शुक्रवार, दि. २८ डिसेंबर २०१८**

## कार्यक्रमपत्रिका

| वेळ | कार्यक्रम | तपशील |
|---|---|---|
| ९ ते ९.३० | नोंदणी | |
| ९.३० ते १० | उद्‌घाटन समारंभ | |
| | स्वागत आणि प्रास्ताविक | डॉ. निरंजन कुलकर्णी |
| | माननीय पाहुण्यांची ओळख आणि त्यांचा सत्कार | |
| १० ते १२ | पहिले सत्र-मौखिक परंपरेतून दिसणारे स्त्रीजीवन | मा. डॉ. एकनाथ पाटील यांचे मार्गदर्शन |
| १२ ते २ | दुसरे सत्र-अर्थशास्त्र व वाणिज्य क्षेत्रातील संशोधन पध्दती | मा. डॉ. अशोक जाधव यांचे मार्गदर्शन |
| | संशोधन प्रस्तावाचे प्रात्यक्षिक, प्रश्नोत्तरे आणि चर्चा | उपस्थित सहभागी विद्यार्थी आणि प्राध्यापक |
| २ ते २.४५ | भोजन | |
| २.४५ | समारोप समारंभ | |
| | मनोगत | सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक |
| | अध्यक्षीय मनोगत | मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे |
| | आभार | डॉ. निरंजन कुलकर्णी |
| | प्रमाणपत्र वितरण | |